
RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2014–16




# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक ११२ ] शनिवार, जानेवारी ४, २०१४/पौष १४, शके १९३५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक २ जानेवारी, २०१४

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम.**

क्रमांक एमआयएस-०५११/प्र.क्र. १७९(१)/राऊशु-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र देशी दारु नियम, १९७३ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता पुढील नियम तात्काळ अंमलात आणले जावेत आणि म्हणून, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५) याच्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे, हे नियम पूर्वप्रसिद्धी न करता काढण्यात यावेत असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ५३ आणि कलम १४३ च्या पोट-कलम (२) चे खंड (ब) व (यु) याद्वारे प्रदान करण्यात अलेल्या अधिकारांचा तसेच या बाबतीत समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता पुढील नियम करीत आहे :—

(१) या नियमांना " महाराष्ट्र देशी दारू (सुधारणा) नियम, २०१३ " असे म्हणावे :—

(२) महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ याच्या नियम २ च्या खंड (क) मध्ये, " प्रभारी अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क, रासायनिक प्रयोगशाळा, मुंबई " या मजकूरानंतर " किंवा वसंतदादा साखर संस्था, पुणे " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**अं. शा. घार्गे,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 2nd January 2014.

## NOTIFICATION

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. MIS-0511/C. R. 179(1)EXC-3.—Whereas, the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973 should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949);

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*b*) and (*u*) of sub-section (*2*) of section 143 with section 53 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973, as follows, namely :–

(1) These rules may be called the Maharashtra Country Liquor (Amendment) Rules, 2013.

(2) In clause (*c*) of rule 2 of the Maharashtra Country Liquor Rules, 1973, after the words " or officer incharge, State Excise Chemical Laboratory, Bombay, the words " or Vasantdada Sugar Institute, Pune " shall be inserted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. S. GHARGE,
Deputy Secretary to Government.